# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे ग्रामीण

पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांचे कार्यालय, पोलीस स्कुल समोर,
खारकर आळी, कोर्ट नाक्या जवळ, ठाणे
e-mail : sp.thane.r@mahapolice.gov.in
दुरध्वनी :- 022-25343567


**ठाणे ग्रामीण पोलीस - प्रेस नोट** दिनांक : ०५/१०/२०१८

## मिरा भाईंदरमध्ये रात्रौचे वेळी सोनसाखळी चोरी करणाऱ्या सराईत चोरांच्या आवळल्या मुसक्या

मागील काही महिन्यांपासून मिराभाईंदर परिसरामध्ये रात्रौच्या वेळी चैन स्नेचींगचे गुन्हयांमध्ये वाढ झाली असल्याने, मा. पोलीस अधीक्षक सो, ठाणे ग्रामीण यांनी सदरचे गुन्हे ऊघडकीस आणण्यासाठी सुचना दिल्या होत्या.

त्याप्रमाणे रात्रौच्या चैन स्नेचींगचे उपलब्ध सीसीटीव्ही फुटेजच्या पडताळणी दरम्यान, दोन इसम मोटारसायकल वरुन चैनस्नेचींग करीत असल्याचे दिसले ते करीत असलेल्या चैनस्नेचिंगवर अभ्यास करता, मिराभाईंदर परीसरामध्ये रात्रीच्या वेळी फिरणाऱ्या पुरुष व स्त्रियांच्या गळ्यातील सोनसाखळी, मोटारसायकलवरुन येऊन जबरीने सोनसाखळी चोरी करण्याची कार्यपध्दती असल्याचे लक्षात आले. त्या पध्दतीचे गुन्हे करणा-या आरोपींच्या रेकॉर्डची पडताळणी केली असता, सीसीटीव्ही फुटेजमध्ये मोटारसायलवरुन पुरुष आणि महिलांच्या गळ्यातील सोनसाखळी खेचणारा आरोपी हा परशुराम देजू सॅलियन असल्याचे निष्पन्न झाले. उपलब्ध सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपासच्या विश्लेषणाकरीता अहोरात्र मेहनत घेऊन, बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार नमुद गुन्हे करणारा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार परशुराम ऊर्फ अन्नू देजु सालियन, वय ३२ वर्षे राहि. विरार व त्याचा साथीदार आनंदकुमार ऊर्फ मोनु समरबहादुर सिंह, वय २८ वर्ष, अंधेरी (पू.) यांना **नयानगर पोलीस ठाणे गुन्हा रजि नं I २०८/२०१८ भादविसक-३९२,३४** या गुन्हयात दिनांक २८/०९/२०१८ रोजी अटक करण्यात आले आहे.

त्याच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास केला असता, त्यांनी मिराभाईन्दर परीसरामध्ये डिसेंबर-२०१७ पासून आतापर्यंत जबरीने सोनसाखळी चोरी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

सोनसाखळी चोरीमध्ये अटक करण्यात आलेला आरोपी परशुराम ऊर्फ अन्नू देजु सालियन हा सराईत गुन्हेगार असून, त्याच्यावर मुंबई, ठाणे ठिकाणच्या विविध पोलीस ठाण्यांमध्ये सोनसाखळी चोरीचे बरेच गुन्हे दाखल आहेत.

अटक आरोपी याच्याकडे गुन्ह्यांच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या तपासामध्ये **नयानगर पोलीस ठाणे येथे ०५ गुन्हे, मिरारोड पोलीस ठाणे येथे ०३ गुन्हे, काशिमिरा पोलीस ठाणे येथे ०९ व भाईन्दर पोलीस ठाणे येथे ०१ असे एकुण-१८ गुन्हे ऊघडकीस आणुन त्यातील एकुण १३,०३,५००/- रुपये किंमतीचे ४४६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीने व गुन्हयात वापरलेली काळ्या निळ्या रंगाची एक बजाज पल्सर २२० मोटारसायकल किंमत ४०,०००/- असा एकुण १३,४३,५००/- रुपये किंमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे**. आरोपी यांची दिनांक ०८/१०/२०१८ पर्यन्त पोलीस कोठडी मंजुर आहे.

डॉ. श्री. शिवाजी राठोड, मा. पोलीस अधीक्षक सो, ठाणे ग्रामीण, श्री. संजय पाटील, मा. अपर पोलीस अधीक्षक सो, ठाणे ग्रामीण यांच्या आदेशान्वये आणि श्री. व्यंकट आंधळे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो, स्थानिक गुन्हे शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली काशिमीरा युनिटचे प्रभारी अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक, श्री. प्रमोद बडाख, पोलीस उप निरीक्षक अभिजीत भुपेंद्र टेलर, सहा. फौजदार अनिल वेळे, पो.हवा. किशोर वाडीले, चंद्रकांत पोशिरकर, अर्जुन जाधव, पो.ना. अशोक पाटील, संजय शिंदे, अविनाश गर्जे, पुष्पेंद्र थापा, सचिन सावंत, प्रदिप टक्के तसेच पो.शि. राजेश श्रिवास्तव, सतिष जगताप, आणि अतुल केंद्रे यांनी अथक तपास करुन आरोपींना अटक केली आणि मिराभाईन्दर विभागतील सोनसाखळी चोरीचे गुन्हे उघडकीस आणून गुन्ह्यातील गेला माल हस्तगत केलेला आहे.

# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे ग्रामीण

पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांचे कार्यालय, पोलीस स्कुल समोर,
खारकर आळी, कोर्ट नाक्या जवळ, ठाणे
e-mail : sp.thane.r@mahapolice.gov.in
दुरध्वनी :- 022-25343567



।।।।।।।।